# राज्य माहिती आयोग, मुख्यालय, मुंबई

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये**
**दाखल झालेले अपील**

**क्र.मुमाआ/नों.क्र.८७३०/२१/अ.क्र.७०६/२५**
**क्र.मुमाआ/नों.क्र.८७३८/२१/अ.क्र.७०८/२५**

श्री.मंगेश बी. कदम
बिल्डींग नं.१ बी, ब्लॉक नं.११०
१ ला मजला, स्वदेशी मिल कंपाऊंड,
चुनाभट्टी (पू.), मुंबई-४०० ०२२.

विरुद्ध

जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (रस्ते) पू.उप.एस विभाग,
बृ.मुं.म.पा. उप प्रमुख अभियंता (पजवा) पूर्व उप. यांचे कार्यालय,
५ वा मजला, परिवार बिल्डींग, प्लॉट नं.सीटीएस ११९/ बी, कांजूर व्हिलेज,
कांजूरमार्ग (पू.), मुंबई-४०० ०४२.

प्रथम अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता (रस्ते) पू.उप.एस व टि विभाग,
बृ.मुं.म.पा. उप प्रमुख अभियंता (पजवा) पूर्व उप. यांचे कार्यालय,
५ वा मजला, परिवार बिल्डींग, प्लॉट नं.सीटीएस ११९/ बी, कांजूर व्हिलेज,
कांजूरमार्ग (पू.), मुंबई-४०० ०४२.

**द्वितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : १९.०५.२०२५**

अपीलकर्ता : उपस्थित
विद्यमान जन माहिती अधिकारी : अनुपस्थित
प्रथम अपीलीय अधिकारी : अनुपस्थित

| मूळ अर्जाचा दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपीलाचा दिनांक | प्रथम अपीलीय प्राधिकाऱ्याच्या निर्णयाचा/आदेशाचा दिनांक |
|---|---|---|---|
| १४.१२.२०२० | ३०.१२.२०२० | ०९-०२-२०२१ | २५.०५.२०२१ |

अपिलकर्तांनी माहिती अर्ज दि.१४.१२.२०२० अन्वये एई-९८ व एई-२३४ संबंधित एकूण ९ मुद्यांच्या माहितीची मागणी केलेली आहे. जन माहिती अधिकारींनी दि.३०.१२.२०२० च्या पत्रान्वये अपिलकर्त्यांना माहितीच्या निरीक्षणची वेळ कळवून निरीक्षण नंतर हव्या असलेल्या प्रतींसाठी योग्य शुल्क भरल्यानंतर माहितीच्या प्रती उपलब्ध करुन देण्यात येतील असे कळविले. अपिलकर्तांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ कलम १९ (१) अंतर्गत दि.०९.०२.२०२१ रोजी जन माहिती अधिकारी यांनी पत्र पाठविले. माहिती निरिक्षण अवलोकन देवून चलन शुल्क बनवून देण्यात यावे याकरीता **प्रथम अपिल** दाखल केले.

प्रथम अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता (रस्ते) पूर्व. उप. एस व एम/पूर्व विभाग यांनी दि.२५.०५.२०२१ च्या आदेशान्वये कोविड-१९ मुळे उदभवलेल्या टाळेबंदीमुळे या कार्यालयातील मनुष्यबळ कोविड-१९ कर्तव्यार्थ कार्यरत होते. त्यामुळे उपलब्ध मनुष्यबळाचा वापर करुन माहिती अधिकारांतर्गत प्राप्त झालेल्या अर्जाचा जास्तीत जास्त निपटारा करण्याचा प्रयत्न कार्यालयातर्फे केलेला आहे. तथापि, टाळेबंदीच्या कालावधीतील मर्यादांचा विचार करता, उत्तरास विलंब होण्याची शक्यता नाकारता येत नाही या पार्श्वभूमिवर अपिलकर्त्यास जन माहिती अधिकारी यांनी विहित कालावधीत उत्तर दिले असून अपिलकर्त्यास शुल्क कळविले आहे. लॉकडाऊन नंतर शुल्क भरल्यानंतर १० दिवसांत जन माहिती अधिकारी यांनी अपिलकर्त्यास मुद्देनिहाय माहिती उपलब्ध करून दयावी, असे नमूद करून सदर अपिल निकाली काढण्यात येत आहे असे आदेश पारित केले.

माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) नुसार अपिलकर्ता यांनी आयोगाकडे दि.२९.०७.२०२१ रोजी जन माहिती अधिकारींना व्यक्तीश: भेटून देखिल जाणीवपूर्वक माहिती निरीक्षण अवलोकन देवून चलन शुल्क देण्यास टाळाटाळ केली असे कारण नमूद करुन **द्वितीय अपिल** दाखल केले आहे.

सदर द्वितीय अपिलावर आज दि.१९.०५.२०२५ रोजी सुनावणीच्या वेळी अपिलकर्ता उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी आणि प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी अपिलकर्तांनी आयोगास सादर केले की, त्यांना माहितीचे निरीक्षण देण्यात आलेले नाही.

विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी आयोगाचे आदेश प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून ७ दिवसात अपिलार्थीस दिनांक व वेळ नमूद करून अवलोकन घेण्याबाबत पत्र देण्यात यावे, त्यानुसार अवलोकन घेण्यासाठी अपिलार्थी उपस्थित झाल्यास अवलोकनाअंती चिन्हांकित केलेली ५० पृष्ठापर्यंतची माहिती अपीलकर्तास विनामूल्य द्यावी व त्यावरील पृष्ठांची माहिती सशुल्क प्रदान करण्याच्या निर्देशासह प्रस्तुत द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे. सबब आयोग पुढील आदेश देत आहे:

**आदेश**

**१. वरील विवेचनानुसार विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी कार्यवाही करावी.**

**२. अपिल निकाली काढण्यात येत आहे.**

**मुंबई**
**दिनांक : १९-०५-२०२५**

**( राहुल भा. पांडे )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

State Information Commission ★ Maharashtra ★